International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 2 January – February - 2026

# शाश्वत विकासात किल्ल्यांचे महत्त्व

**डॉ. पूनम रमेश भूयेकर**

*सहाय्यक प्राध्यापक, श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय कोल्हापूर*

*Corresponding Author –* *डॉ. पूनम रमेश भूयेकर*

**DOI - 10.5281/zenodo.18491217**

**प्रस्तावना:**

शत्रूच्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यास आणि आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्यास म्हणून बांधलेल्या वास्तुला इंग्रजीत फोर्ट (Fort), कॅसल (Castle) असे म्हणतात तर मराठीत दुर्ग ,गिरिदुर्ग, किल्ला, द्वीपदुर्ग ,गढी कोट ,बालेकिल्ला इत्यादी संज्ञांनी या वास्तूचे निरनिराळे प्रकार दर्शविले जातात. छत्रपती शिवाजी महाराज आणि किल्ले यांचा जवळचा संबंध आहे. सातवाहन ,राष्ट्रकूट ,चालुक्य ,शिलाहार ,यादव बहामनी ,मोगल ,पोर्तुगीज यांचाही दुर्ग बांधणीतील सहभाग महत्त्वाचा आहे. दुर्ग बांधणी तंत्राचा उपयोग छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुर्गरचनेत आढळतो.

महाराष्ट्रातील किल्ल्यांच्या संख्येचा विचार केला तर सुमारे 40 ते 50 टक्के किल्ले 73 व 74 रेखांश आणि 20 ते 17 अक्षांशाच्या चौकटीमध्ये आहेत. शिवरायांच्या हिंदवी स्वराज्याचा नेमका हाच गाभा होता. महाराष्ट्राच्या इतिहास आणि भूगोलावर दुरगामी परिणाम करणारे साल्हेर, मुल्हेर, धोडप, शिवनेरी, रायगड, प्रतापगड, राजगड, सिंहगड, विशाळगड, पन्हाळा, विजयदुर्ग, जंजिरा, सिंधुदुर्ग या किल्ल्यांचा समावेश ही याच दुर्ग प्रदेशात होतो हे नकाशावरून अधिकच स्पष्ट होते.[1]

**किल्ल्यांची बांधणी प्राचीन संदर्भ:**

मानवाने आपले थंडी वाऱ्यापासून, हिंस्र पशु प्राण्यांपासून संरक्षण व्हावे यासाठी सुरुवातीला एक सुरक्षित आडोसा शोधून काढला व तो गुहेत राहू लागला नंतर तो समूहाने फिरू वावरू लागला अन्नशोधक मानवापासून अन्न उत्पादक मानवापर्यंत त्याची प्रगती झाली. नंतर त्याने पाण्याच्या आसपास काटेरी कुंपण घातलेल्या वस्त्या निर्माण केल्या हे देखील एक प्रकारचे किल्ले .कारण दुसऱ्यांपासून बचाव संरक्षणात्मक उपाययोजना आणि वेळप्रसंगी तेथे राहून दुसऱ्यावर हल्ला चढवणे ही उद्दिष्टे या काटेरी कुंपणामुळे शक्य होत असत.2 म्हणजे एकंदरीत स्वसंरक्षणासाठी या काळात किल्ल्यांची निर्मिती झाल्याचे आपल्याला दिसून येते.

मनुस्मृति मध्ये दुर्गांचे सहा प्रकार सांगितले आहेत:

1) धनुदुर्ग- सभोवताली वीस कोसापर्यंत पाण्याचा पुरवठा नसणारा किल्ला.

2) महीदुर्ग- बारा हात उंचीच्या वरून फिरत येणे शक्य असलेल्या रुंदीच्या व झरोख्यांसारख्या खिडक्या असणारी तटबंदी असणारा किल्ला.

3) अब्दुर्ग - सभोवताली भरपूर पाण्यामुळे नैसर्गिक संरक्षण मिळालेला म्हणजे बेटावरचा किल्ला.

4) वाक्षदुर्ग- अतिशय दाट झाडीत लपलेला किल्ला.

5) नृदुर्ग - हत्ती, घोडे, रथ, पायदळ यांचे संरक्षण लाभलेले ठिकाण

6) गिरीदुर्ग- डोंगरी उंचवाट्यावर पुरेसा पाणीपुरवठा असणारे झाडे व धान्य पिकवता येतील असे पण जाण्यासाठी सहसा एखादीच वाट असणारे स्थान.

दुर्गात राहणारा एकच माणूस 100 जणांशी लढू शकतो तर किल्ल्यात राहून 100 लढाऊ वीर 10000 जणांशी देखील सहज लढू शकतील अशी किल्ल्यांची ताकद असल्याचे मनुस्मृतीत म्हटले आहे.3 यावरून किल्ला संरक्षण दृष्ट्या किती महत्त्वाचा आहे हे आपल्याला या वाक्यामधून समजते.

**ऐतिहासिक दृष्ट्या किल्ल्यांचे महत्त्व:**

रामचंद्र पंत अमात्य किल्ल्यांचे महत्त्व सांगताना आज्ञापत्रात म्हणतात, संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग, दुर्ग नसता मोकळा देश पर चक्र येताच निराश्रय, प्रजा भग्न होऊन देश उध्वस्त होतो .देश उध्वस्त झाल्यावरही राज्य असे कोणास म्हणावे याकरता पूर्वी जे जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो देश शाश्वत करून घेतला आणि आले पर चक्र संकट दुर्गाश्रय परिहार केले. हे राज्य तर छत्रपती शिवाजी महाराजांनी दुर्गा वरूनच निर्माण केलेले दिसते.[4]

या गडांची रचना करताना छत्रपती शिवाजी महाराजांनी निसर्गात उपलब्ध असणाऱ्या नैसर्गिक साधन संपत्तीचा चांगल्या पद्धतीने वापर केला त्यासाठी त्यांनी निसर्गातील झाडे ,वनस्पती यांचा नाश होणार नाही याकडेही लक्ष दिलेले दिसते. आणि संकट प्रसंगी संरक्षणाच्या दृष्टिकोनातून शिवाजी महाराजांनी हीच काटेरी झुडपे वनस्पती यांचा वापर संरक्षणासाठी शत्रू बरोबर लढाई करण्यासाठी केलेला दिसतो.[5]

शिवाजी महाराजांनी गडावरी मार्गामार्गावरी बाजारात तटोतट केर कसपट कीमपि पडून द्यावे ताकीद करून झाला केर गडाखाली न टाकीता जागोजागी जाळून ती राख ही परसात टाकून घरोघर होईल ते भाजीपाले करावे.[6]

यावरून छत्रपती शिवाजी महाराजांचे पर्यावरणीय विचार त्याचबरोबर कचरा व्यवस्थापना विषयीचे विचार देखील आपल्याला समजतात. छत्रपती शिवाजी महाराजांचे हे विचार आज एकविसाव्या शतकात देखील खूप महत्त्वपूर्ण ठरतात. आज ज्यावेळी आपण एखाद्या पर्यटन स्थळी किल्ल्यावर भेट देतो त्यावेळी आपण त्या ठिकाणी अशा विचारांची माहिती देणे गरजेचे ठरते तरच आपला ऐतिहासिक वारसा आणि ऐतिहासिक स्थळ जपलं जाऊन ते पुढील पिढीपर्यंत टिकून राहील.

**शिवाजी महाराजांनी दुर्ग बांधणीत केलेले प्रयोग:**

एखादा वास्तुशास्त्रज्ञ बांधकामातील बारीक-सारीक रचनांचे प्रत्यक्ष प्रयोग आपल्या संकल्पित बांधकामातून खरोखर करून पाहतो. सुचवलेले विचार, प्रत्यक्ष आलेले अनुभव त्यात केलेले बदल अशा अनेक गोष्टींमुळे एक विशिष्ट शैली निर्माण होते हे सारे शिवाजी महाराजांच्या दुर्ग बांधणीचा अभ्यास केला की आपल्याला जाणवू लागते. उदाहरणच द्यायचे झाले तर किल्ले पद्मदुर्ग इतर किल्ल्यांप्रमाणेच एकावर एक दगड ठेवून हा किल्ला बांधला आहे. पण दोन दगडांमधील चुना इतका भक्कम आहे की गेल्या तीनशे वर्षात रोज भरती ओहोटीच्या लाटा आपटून इथल्या तटबंदीतील दगड झिजून गेले पण तिला चुना मात्र तसाच आहे. यावरूनच त्या वेळच्या स्थापत्य कलेचे प्रतिबिंब येते.[7]

शिवाजी महाराजांनी सागरी राजधानी असणाऱ्या सिंधुदुर्ग बांधत असताना एक वेगळा प्रयोग केलेला दिसतो.

500 पाथरवट, २०० लोहार ,100 गोवेकर पोर्तुगीज आणि तीन हजार मजूर यांच्या प्रयत्नातून त्यांनी सिंधुदुर्ग उभा केला, व त्याचा पाया मजबूत होण्यासाठी त्यामध्ये उकळते शिसे त्याच्या पायात ओतून त्याची उभारणी केली गेली. 8 त्यामुळेच आज तो समुद्रात डौलाने मराठ्यांची सागरी राजधानी म्हणून उभा असलेला दिसून येतो. म्हणूनच आज शिवाजी महाराजांच्या स्थापत्य शास्त्राची गरज आहेअसेच वाटते.

**शाश्वत विकासात किल्ल्यांचे महत्त्व:**

शाश्वत विकासात किल्ल्यांचे महत्त्व सांस्कृतिक वारसा जतन ,पर्यटन वाढ ,स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना आणि शिक्षण व जनजागृती मध्ये आहे. कारण हे किल्ले केवळ ऐतिहासिक वास्तू नसून ते जलव्यवस्थापन स्थापत्यशास्त्र आणि सामाजिक राजकीय इतिहासाचे प्रतीक आहेत ज्याचे जतन करून भविष्यकालीन पेढ्यांसाठी त्याचा उपयोग करता येतो.

**1) सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा जतन:**

किल्ले हे आपल्या पूर्वजांच्या शौर्याचे स्थापत्य कलेचे आणि संस्कृतीचे प्रतीक आहेत ते आपला ऐतिहासिक वारसा आहेत त्यांचे जतन केल्याने आपली ओळख आणि इतिहास टिकून राहतो.

**2) पर्यटन आणि रोजगार निर्मिती:**

ऐतिहासिक किल्ले पर्यटनाचे प्रमुख केंद्र बनतात ज्यामुळे स्थानिक ठिकाणी रोजगार उदा. हॉटेल्स ,गाईड ,हस्तकला निर्माण होते. पर्यटनामुळे पायाभूत सुविधांचा विकास होतो उदा. रस्ते ,वीज ,पाणी ज्यामुळे स्थानिक लोकांचे जीवनमान सुधारण्यास मदत होते.

**3) शिक्षण आणि जनजागृती:**

किल्ले विद्यार्थ्यांना इतिहासाची प्रत्यक्ष माहिती देतात आणि देशभक्तीची भावना विद्यार्थ्यांमध्ये जागृत करण्यास मदत करतात त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी आवड व अभिमान निर्माण होतो.

**4) आर्थिक विकास:**

पर्यटनातून मिळणारा महसूल राज्याच्या अर्थव्यवस्थेला अर्थ हातभार लावतो .हस्तकला आणि स्थानिक उत्पादनांना प्रोत्साहन मिळते. त्यामुळे स्थानिक ठिकाणी रोजगार निर्मिती होऊ शकते.

**5) पर्यावरण आणि जल व्यवस्थापन:**

किल्ल्यावर असलेले पाण्याचे टाके (जलकुंड )आणि नैसर्गिक रचना त्या काळातील जनसंधारणाचे उत्कृष्ट उदाहरण आहेत ज्यातून शाश्वत जलव्यवस्थापनाचे धडे मिळतात.

**6) सामाजिक आणि राजकीय धडे:**

छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्यांचा वापर करून स्वराज्य निर्मिती केली.' रयतेचे राज्य' निर्माण केले राज्यकारभारात सर्व जाती धर्मातील लोकांना समान संधी दिली.यातून समान संधी आणि सामाजिक न्यायाचे धडे मिळतात.

**शाश्वत विकासासाठी किल्ल्यांचा उपयोग:**

किल्ल्यांचा वापर लष्करी उद्देशाऐवजी सांस्कृतिक केंद्र, संग्रहालय किंवा पर्यटन सुविधासाठी देखील केला जाऊ शकतो तरच किल्ल्यांचे महत्त्व अबाधित राहण्यास उपयोग होईल. किल्ले संवर्धनासाठी सरकार आणि खाजगी संस्था त्याचबरोबर युवा पिढीने एकत्र येऊन या संदर्भात जनजागृती करणे आवश्यक आहे. पर्यटनाच्या माध्यमातून होणाऱ्या विकासाचे नियोजन अशा प्रकारे करणे जेणेकरून किल्ल्यांची नैसर्गिक आणि ऐतिहासिक रचना अबाधित राहील.

**संदर्भ साधने:**

1) घाणेकर प्र. के., अथातो दुर्ग जिज्ञासा, स्नेहल प्रकाशन पुणे, पृ.10
2) गायकवाड, सरदेसाई, हनमाने, ऐतिहासिक कागदपत्रे व स्थळे यांचा अभ्यास, फडके प्रकाशन कोल्हापूर, पृ .107-108
3) उपरोक्त, घाणेकर प्र. के. पृ.20
4) आज्ञापत्र
5) आज्ञापत्र
6) आज्ञापत्र
7) उपरोक्त घाणेकर प्र. के. पृ.83-84
8) कुलकर्णी अ.रा. अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन पुणे